# मानस पूजा

नमो स्वामीराजं दत्तावतारम्। श्री विष्णू ब्रह्मा शिव शक्ति रुपम्।।
ब्रह्मस्वरुपाय करुणाकराय। स्वामी समर्थाय नमो नमस्ते।।
हे स्वामी दत्तात्रया हे कृपाळा। मला ध्यानमूर्ती दिसू देई डोळा।।
कुठे माय माझी म्हणे बाळ जैसा। समर्था तुम्हांवीण हो जीव कैसा।।
स्वामी समर्था तुम्ही स्मर्तृगामी। हृदयासनीं या बसा प्रार्थितो मी।।
नमन माझे दयाळू कृपाळू धरणी मातेसी।
पालन करी या मुढपामरी जीवासी।।
प्रात:स्मरण करोनी हया सप्तद्विप मायेसी।
सिद्धाता द्यावी सद्‌गुरु
श्री स्वामी समर्थ पूजेसी।।
पुजेचे यथासांग साहित्य केले। मखरांत स्वामी गुरु बैसविले।।
महाशक्ति जेथे उभ्या ठाकताती। जिथे सर्व सिध्दीं पदीं लोळताती।।
असे सर्व सामर्थ्य तो हा समर्थ। परब्रह्म साक्षात् गुरुदेव दत्त।।
सुवर्णताटी महारत्न ज्योती। ओवाळुनी अक्षता लावूं मोती।।
शुभारंभ ऐसा करुनी पुजेला। चरणांवरी ठेऊ या मस्तकाला।।
हा अर्ध्य अभिषेक स्विकारी माझा। तुझी पाद्यपुजा करी बाळ तुझा।।
प्रणिपात साष्टांग शरणागताचा। तुम्हां वाहिला भार या जीवनाचा।।
ही ब्रह्मपूजा महाविष्णू पूजा। शिवशंकराची असे शक्तिपूजा।।
दही दूध शुध्दोदकाने तयाला। पंचामृत स्नान घालूं प्रभूला।।
वीणा तुताऱ्या किती वाजताती। शंखादि वाद्ये पहा गर्जताती।।
म्हणती नगारे गुरुदेंव दत्त। श्रीदत्त जय दत्त स्वामीं समर्थ।।
प्रत्यक्ष गंगा जलकुंभी आली। श्रीदत्त स्वामीसिया स्नान घाली।।
महासिध्द आलें पदतीर्थ घ्याया। महिमा तयाचा कळे ना जगा या।।
मी धन्य झालो हे तीर्थ घेतां। घडू दे पूजा ही यथासांग आता।।
आजानुबाहू भव्य कांती सतेज। नसे मानवी देह हा स्वामीराज।।
प्रत्यक्ष श्रीसद्‌गुरु दत्तराज। तया घालुया रेशमी वस्त्रसाज।।

सुगंधीत भाळी टिळा रेखियेला। शिरीं हा जरी टोप शोभे तयाला।।
वक्ष:स्थळी लाविल्या चंदनाचा। सुवास तो वाढवी भाव साचा।।
शिरी वाहुया बिल्व तुलसी दलाते। गुलाब जाईजुई अत्तराते।।
गंधाक्षता वाहुनी या पदाला। ही अर्पूया जीवन पुष्पमाला।।
चरणी करांनी मिठी मारुं देई। म्हणे लेकरासी सांभाळ आई।।
इथे लावुया केशर कस्तुरीचा। सुगंधात धूप नाना प्रतीचा।।
पुष्पांजली ही तुम्हा अर्पियली। गगनांतुनी पुष्पवृष्टी जहाली।।
करुणावतारी अवधूत कीर्ति। दयेची कृपेचीच जी शुध्द मुर्ती।।
प्रभा फांकली शक्तिच्या मंडलाची।
अशी दिव्यता स्वामी योगेश्वराची।।
हृदयमंदिराची ही स्नेहज्योती। मला दाखवी स्वामीची योगमूर्ती।।
करु आरती आर्तभावे प्रभूची। गुरुदेव श्री स्वामी दत्तात्रयाची।।
पंचारती ही असे पंचप्राण। ओवाळुनी ठेऊ चरणांवरुन।
निघेना पुढे शब्द बोलूं मी तो ही। मनीचे तुम्ही जाणतां सर्व काही।।
हे स्वामीराजा बसा भोजनाला। हा पंचपक्वान्न नैवेद्य केला।।
पुरणाची पोळी तुम्हां आवडीची। लाडू करंजी असे ही खव्याची।।
डाळींब द्राक्षे फळे आणि मेवा। हे केशरी दुध घ्या स्वामीदेवा।।
पुढे हात केला या लेकराने। प्रसाद द्यावा आपुल्या कराने।।
तांबूल घ्यावा स्वामी समर्था। चरणाची सेवा करु द्यावी आतां।।
प्रसन्नतेतून मागूं मी काय। हृदि ठेव माते तुझे दोन्ही पाय।।
घालूनी प्रदक्षिणा सुंदर या ब्रम्हांड मालकाला।
अमोल हे परब्रह्म दाखवावे या बालकाला।।
धरुं दे आतां घट्ट तुझ्या पदाला। पदी वाहु दे शीर हया शरणागताला।।
हृदीं भाव यावे असे तळमळीचे। करी पूर्ण कल्याण हे या जीवाचे।।
तुझे बाळ पाही तुझी वाट देवा। नका वेळ लावू कृपा हस्त ठेवा।।
मनी पूजनाची असे दिव्य ठेव। वसो माझिया अंतरी श्री स्वामीदेव।।
श्री गुरुदेव दत्त। श्री स्वामी समर्थ महाराज की जय।